पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/५०२/२०१०
दिनांक- २०/०५/२०१०

प्रति,
मा. .....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २५.०५.२०१० रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २५.०५.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक- १७०

दिनांक- २५.०५.२०१० वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २५.०५.२०१० रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ११.५.२०१० व १३.५.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६८) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक १८.५.२०१० रोजी [दु.४:०० व ४:०५] झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६९) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) श्री.अजय जनार्दन सुर्यवंशी यांना महापालिके मध्ये कायदा सल्लागार या पदावर ६ महिने कालावधीसाठी कोणतेही आर्थिक लाभ व सोयीसुविधा न देता फक्त र.रू.२५,०००/- [र.रू.पंचवीस हजार] मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१३९ अन्वये, वॉर्ड क्र.५८ रावेत येथे पवना नदी काठी घाट बांधणे (फेरनिविदा) कामी मे.आर.आर.पाटील (नि.र.रू. २८,००,२४४/- [र.रू.अठ्ठावीस लाख दोनशे चव्वेचाळीस] पेक्षा १८.०० % जास्त) (सन २००८-०९ च्या चालू दराशी तुलना करता १७.७९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.३३,०४,२८८/- [र.रू.तेहतीस लाख चार हजार दोनशे अठ्ठ्याऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ३) पिंपरी चिंचवड मनपाच्या मुख्य कार्यालयातील विविध विभागांसाठी ISM Office NT ५० Users Upgrade करणे कामीची तातडीची गरज विचारात घेता निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने कामकाज करून घेणे आवश्यक असल्याने सदरचे ISM Office NT ५० Users Upgrade १ नग मे.Data Care Corporation, Pune-०४. यांचेकडून दुरुस्ती करणेस व येणाऱ्या र.रू.१०,७९१/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ४) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४० नुसार, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मे.सुमित स्पोर्टस ॲण्ड फिटनेस, इक्विपमेंट्स, चिंचवड, पुणे- १९ व मे.वरदायिनि एन्टरप्रायझेस, चिंचवड, पुणे १९ यांचे नावापुढे नमुद केलेल्या तलावांची पाणीशुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाचे प्रस्तावात नमुद केलेले दरांस (मासिक दर अ.क्र.१ ते ८ तलाव एकुण र.रु.६,४४,०००/-) व पिंपळे गुरव जलतरण तलाव नवीन असल्याने, या तलावाच्या कामाचे दर मंजुर नसल्याने, या तलावाची पाणी साठविण्याची क्षमता मोहननगर,चिंचवड जलतरण तलावा इतकीच (१० लाख लिटर्स) असल्याने, त्या तलावांच्या दराने र.रु.८५,०००/- मासिक दरांप्रमाणे पिंपळे गुरव जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज करुन घेण्यास व याकामाचे संबंधित ठेकेदारांकडुन एक वर्षाचा करारनामा करुन घेण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ५) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४१ नुसार, म.न.पा.ची स्वा.सावरकर व्यायामशाळा निगडी (प्राधिकरण) सेवाशुल्क तत्वावर वनिता मंडळ, निगडी (प्राधिकरण) या संस्थेस चालविण्यास द्यावयाची की शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास द्यावयाची याबाबत फेरविचार करून शरयूनगर प्रतिष्ठान प्राधिकरण या संस्थेस चालविण्यास देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ६) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४२ नुसार, मनपा व्यायामशाळेतील व्यायाम साहित्याची दुरुस्ती करून घेणेकामी क्रिडा विभागा कडून कोटेशन नोटीस प्रसिध्द करूनही यास प्रतिसाद मिळालेला नाही. मनपा व्यायामशाळेतील व्यायाम साहित्याची दुरुस्ती करून मिळणेबाबत नागरीक व मा.नगरसदस्य सतत मागणी करीत असतात. तरी नि.नो.क्र.२/२००७-०८ चे मंजूर दरांनुसार मे.गिनिज स्पोर्टस, पुणे-२६ यांचेकडून विहीत नमुन्यात २ वर्षाचा करारनामा करून आवश्यक अनामत रकमेचा एफ.डी.आर. घेऊन मनपा व्यायामशाळा साहित्याची दुरुस्ती करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे र.रू.१०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ७) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ५/५/२०१० ठराव क्र.४३ नुसार, पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने मनपा परिसरात महापौर चषक जिल्हास्तरीय क्रिकेट व कराटे स्पर्धा आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ८) मनपाच्या वतीने महाराष्ट्र दिन व संयुक्त महाराष्ट्राच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त दि.२९/४/२०१० रोजी पिंपरीवाघेरे येथील यशवंतराव चव्हाण स्टेडीयमवर मराठी तारका या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे साठी मोठे स्टेज, मेकअप रूम, फायबर खुर्च्या, मैदानामध्ये व स्टेजवर मॅटींग इ.व्यवस्था करणे [अपेक्षित खर्च र.रू.५,००,०००/-] कामी अशा प्रकारचे काम मे.सिध्दी एंटरप्रायजेस (नि.नो.क्र.१/१२७-२००८/०९) हे ०.१०% कमी दराने करीत असले तरी सदरच्या कामाची तातडी व काम वेळेत पुर्ण करणे या अटीसहीत त्याचदराने व अटी शर्तीने करण्यास मे.वधवा मंडप ॲण्ड कंपनी यांनी मान्यता दिलेली असून त्यामध्ये त्यांनी नियमाप्रमाणे सर्व्हिस टॅक्स १०.३० % व वॅट टॅक्स १.५० % अदा करणेस विनंती केलेली असल्याने उपरोक्त काम थेट पध्दतीने करणेच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ९) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.६० बळवंतनगर मधील रस्ते कारपेट पध्दतीने डांबरीकरण करणे (फेरनिविदा) कामी मे.अजवानी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू.१९,४४,२३७/- [र.रू.एकोणीस लाख चव्वेचाळीस हजार दोनशे सदोतीस] पेक्षा १८.५५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू. १५,८३,५८१/- [र.रू.पंधरा लाख त्र्याऐंशी हजार पाचशे एक्याऐंशी] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- १०) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२०/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.६० चिंचवडेनगर मधील उर्वरीत रस्ते कारपेट पध्दतीने डांबरीकरण करणे (फेरनिविदा) कामी मे.अजवानी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू.१९,४४,५८४/- [र.रू. एकोणीस लाख चव्वेचाळीस हजार पाचशे चौऱ्याऐंशी] पेक्षा १८.५५ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू. १५,८३,८६३/- [र.रू.पंधरा लाख त्र्याऐंशी हजार आठशे त्रेसष्ट] पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेमधील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- ११) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२८ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिला बचतगट समता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमास प्रति महिला लाभार्थी प्रति दिन र.रू.१००/- या प्रमाणे दोन दिवसीय कार्यक्रम राबविणेस अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था पुणे यांना दि.३१/३/२०११ पर्यंत

मुदतवाढ देणेस व या कामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- १२) मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक २९/३/२०१० ठराव क्र.२९ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत महिलांना विविध व्यवसाय प्रशिक्षण अंतर्गत प्रशिक्षण अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या ३ वर्षांपासून चांगल्याप्रकारे राबवित असल्या कारणाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांना दि.३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ देणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- १३) महाराष्ट्र शासन निर्णयान्वये पी.एम.टी. व पी.सी.एम.टी. या दोन्ही संस्था एकत्र होऊन पी.एम.पी.एम.एल. या नावाने नवीन संस्था स्थापन झाली असुन शासन निर्णयानुसार मागील तीन वित्तीय वर्षात पीएमटी व पी.सी.एम.टी. दोन्ही महापालिकांनी खर्च भागविणे साठी जे अनुदान दिले असेल त्याची सरासरी काढून सरासरी एवढे अनुदान संबंधीत महापालिका कंपनीकडे वर्ग करेल असे कळविले नुसार या मनपाने रक्कम अदा केलेली असून सदर तीन वर्षे कालावधीची मुदत दि.३१ मार्च, २०१० रोजी पुर्ण झाली असल्याने सन २०१०-११ या आर्थिक वर्षात मुदत पुर्ण झाल्याने परिवहन विभागास उचल या लेखाशिर्षावर कोणतीही तरतूद केलेली नसून तसे पी.एम.पी.एम.एल. यांना कळविण्यात देखील आलेले असताना पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी एप्रिल २०१० चे वेतन अदा करणेसाठी र.रू.१ कोटी २७ लाख मिळणेकामी विनंती केली असल्याने वरील बाबी विचारात घेता पी.एम.पी.एम.एल. यांना रक्कम अदायगीबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.२५.५.२०१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- १४) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.८/२००९/१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.६५, केशवनगर येथील वस्ताद बाळासाो. गावडे जलतरण तलावावर जनरेटर (५० के.व्ही.ए.) बसविणेकामी मे.फ्लोमॅक इंजिनियरिंग कार्पो. (नि.र.रू. ९,३२,२४६/- [र.रू.नऊ लाख बत्तीस हजार दोनशे शेहचाळीस] पेक्षा २५.२० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर

कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १५) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.८/२००९/१० मधील अ.क्र.३ अन्वये, ब प्रभाग विद्युत दाहीनी लिंक रस्ता व प्राचार्य रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथील जनरेटरची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.भाग्यश्री इंटरप्रायईजेस (नि.र.रू.१,३९,९५६/- [र.रू.एक लाख एकोणचाळीस हजार नऊशे छपन्न] पेक्षा १८.१० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १६) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.८/२००९/१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.६५, केशवनगर, चिंचवड येथील वस्ताद बाळासाो. गावडे जलतरण तलावाचे जलशुध्दीकरण यंत्रणेची दुरुस्ती करणेकामी मे.भाग्यश्री इंटरप्राईजेस (नि.र.रू. ५,९९,९०४/- [र.रू.पाच लाख नव्यान्नव हजार नऊशे चार] पेक्षा १८.१० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १७) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२००९/१० मधील अ.क्र.४ अन्वये, प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील ध्वनिक्षेपण यंत्रणेचे वार्षिक चालन देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.राज कार्पोरेशन (नि.र.रू.१,४९,८५२/- [र.रू.एक लाख एकोणपन्नास हजार आठशे बावन्न] पेक्षा ३ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १८) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.७/२००९-२०१० मधील अ.क्र.७ अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील नागरी वस्तीतून जाणारे आवश्यक ते नाले साफ करून नाल्यातील निघालेला गाळ वाहतूक करून मोशी डेपो येथे टाकणे व पसरविणेकामी मे.विपुल असोसिएट्स (नि.र.रू.२,८३,०४८/- [र.रू.दोन लाख त्र्याऐंशी हजार आठ्ठेचाळीस] पेक्षा ४२.५० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- १९) मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००९-२०१० अन्वये, ब प्रभाग कार्यक्षेत्रातील राडारोडा उचलणे व वाहतुक करणेकामी मे.कूतवळ कन्स्ट्रक्शन (प्रति ट्रिप र.रू.४५९/-) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे. (नि.र.रू.२,०१,०००/- [र.रू. दोन लाख एक हजार])

विषय क्रमांक- २०) वॉर्ड क्र.५७ किवळे येथील विकासनगर मधील रस्त्यावर वॉर्डस्तरीय योजनेतुन दिवाबत्ती पोल उभे करणे व इतर कामे करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने विमलाई इलेक्ट्रीक कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९१६/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे सोळा] पेक्षा १.२ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २१) वॉर्ड क्र.६४ मधील नव्याने झालेल्या आरोग्य विभागाच्या कार्यालयाचे विद्युतीकरण करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने विमलाई इले.कार्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू.४९,९६९/- [र.रू. एकोणपन्नास हजार नऊशे एकोणसत्तर] पेक्षा १.२ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २२) मनपाची मो.जा.क्र.४३ एस ब्लॉक, भोसरी, पुणे-२६. येथील विकसीत करावयाचे उद्यानात सिंगल फेज विजमीटर घेणेकामी म.रा.वि.वि.कं.म.यांस र.रू.२,१२१/- [र.रू.दोन हजार एकशे एकवीस] अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २३) प्रस्तावात नमुद प्रमाणे टाईम्स ग्रुप कडील शुध्दीपत्रक व जाहीर नोटीसचे प्रसिध्द झालेल्या जाहीरातीचे एकूण बिल र.रू. १२,५४०/- [र.रू.बारा हजार पाचशे चाळीस] अदा करणे आवश्यक असलेने त्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २४) नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र ‘अ’ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २५) जकात विभागाकरिता मोबाईल मॉडेल क्र.५०३० या प्रकारचा एक नवीन मोबाईल नोकीय कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.स्काय लिंक, चिंचवड यांचेकडून पूर्वस्विकृत दराप्रमाणे थेट पध्दतीने करारनामा न करता व निविदा न मागविता र.रू.२,५२५/- [र.रू. दोन हजार पाचशे पंचवीस] प्रमाणे खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २६) से.नं.२४, संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल मधील उपहारगृह २ रा मजला २५ वर्षाच्या भाडेपट्ट्याने देणेकामी प्राप्त निविदामधील श्रीम.सुप्रिया शेट्टी या निविदाधारकांचे उपहारगृह क्षेत्रफळा प्रमाणे २५ वर्षाचे भाडेपट्ट्याचे निविदा दर हे मनपा दरापेक्षा १५.९१ % ने अधिक असून प्राप्त निविदेत सर्वोच्च दर आहेत. निविदा पध्दतीचा अवलंब केलेने मनपास २५ वर्षाकरीता र.रू.४,९०,३००/- इतके उत्पन्न (मनपा व शासन कराव्यतिरिक्त) मिळणार असून सदरचे उत्पन्न हे मनपा दरापेक्षा १५.९१ % ने (र.रू.७८,०००/-) अधिक मिळणार आहे तरी वरील निविदाधारकांचे सर्वोच्च दर मनपा आर्थिक हित विचारात घेता निविदा अटी शर्तीनुसार स्विकृत करणेस व भाडेपट्टा करारनामा करणेस हरकत नसल्याने प्रस्तावीत केलेप्रमाणे वरील निविदाधारकांना २५ वर्षाच्या लिजने निविदा अटी शर्तीनुसार देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २७) मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.७/२००९-१० अन्वये, मनपा परिसरातील वृक्षांचे मनपा हद्दीत पुर्नरोपण करणेकामी मे.साईकृपा सर्व्हिसेस (नि.र.रू.३९,७८,०००/- [र.रू. एकोणचाळीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार] पेक्षा २०.९९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २८) करसंकलन विभागाला आवश्यक असलेले मिळकत कर बिले छपाई करणेकामी मे.एस.एस.के.इंफोटेक प्रा.ली.यांचे लघुत्तम दर [एका नगासाठी ०=६९ पैसे] प्राप्त झाले असल्याने मे.एस.एस.के.इंफोटेक प्रा.ली., पुणे यांना मिळकत कर बिले छपाई करणेकामी एकूण र.रू.४,१४,४००/- [र.रू.चार लाख चौदा हजार चारशे] चा करारनामा (संविदा) करून पुरवठा आदेश निर्गत केलेला असल्याने केलेल्या संविदेचे अवलोकन करणे.

विषय क्रमांक- २९) मनपाचे आरक्षित जागेवर बी.ओ.टी.तत्वावर विविध ठिकाणी प्रकल्प विकसित करणेकरिता विशेष जाहीरात वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करणेकामी आलेल्या र.रू.५,१६,०००/- [र.रू.पाच लाख सोळा हजार] खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३०) मनपाचे आरक्षित जागेवर बी.ओ.टी.तत्वावर विविध ठिकाणी प्रकल्प विकसित करणेकरिता विशेष जाहीरात वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्द करणेकामी आलेल्या र.रू.५,४८,१००/- [र.रू.पाच लाख आठ्ठेचाळीस हजार शंभर] खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३१) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२६.४.२०१० ते २.५.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४६/२०१० दि.१८.५.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ३२) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३.५.२०१० ते ९.५.२०१० अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४७/२०१० दि.१८.५.२०१० अन्वये पाठविलेला साप्ताहिकलेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक- ३३) उद्यान विभागाचे वापराकरिता पी.सी.एम.टी./पी.एम.पी.एम.एल. यांचेकडून घेण्यात आलेले वाहन क्र.एम.टी.क्यू.८३८ डबलडेकर बस या वाहनाचा वापर दहा वर्षापेक्षा जास्त झाला असलेने आणि पी.सी.एम.टी./पी.एम.पी.एम.एल. यांच्याकडून सदर वाहन लिलावाने विक्री करणे ना हरकत दाखला प्राप्त झालेने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पिंपरी चिंचवड ठरवून दिलेली किंमत अधिक व्हॅटची रक्कम मनपा कोषागरात भरून घेऊन स्वामिनी महिला बचत गट अखिल संघ, निगडी यांना सदर वाहन क्र.एम.टी.क्यू.८३८ डबलडेकर बस ताब्यात देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.
[र.रू.४०,००० अधिक व्हॅट १२.५ टक्के प्रमाणे र.रू.५,०००]

विषय क्रमांक- ३४) मे.बजाज ॲटो लि. विरूध्द पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्पे.सि.सुट क्र.९७३/२००२ चे मे.सिनीअर डिव्हिजन पुणे यांचे निकालावर मे.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेले अपिलावर सुनावणी होतेसमयी पुणे येथील मे.सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन यांनी दिलेल्या निकालाप्रमाणे र.रू. १९,९४,४२,८२२/- व त्यावर दि.२६/११/०९ पासून प्रत्यक्ष धनादेश देणेचे तारखेअखेर ६ % दराने होणाऱ्या व्याज रकमेसह मे.न्यायालयात जमा करणेस व त्याचा खर्च अनामत परतावा या लेखाशिर्षकामधुन करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३५) मनपा हद्दीतील मृत पाळीव प्राण्यांचे दफनभूमीचे कामकाजा करीता स्थानिक नोंदणीकृत अशासकीय संस्था मे.ॲनिमल हेल्थ ऑर्गनायजेशन, प्राधिकरण निगडी यांची एक वर्ष कालावधी करीता नेमणूक करणेस तसेच त्याचेशी करारनामा करून त्यांना र.रू.६,०००/- [र.रू.सहा हजार] प्रति माह अदा करणेस तसेच याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३६) ब्रिटीश लायब्ररी, पुणे यांना सन २०१०-११ सालाकरिता लायब्ररी फी र.रू.६,५००/- [र.रू.सहा हजार पाचशे] धनादेशा व्दारे अदा करणेकामी लायब्ररी या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीमधून खर्च करणे शक्य असल्याने सदरच्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/५०२/२०१०
दिनांक : २०/०५/२०१० चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.